७

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ४१४।७ (७४५)

ग्रंथ नाम ... चरित्र.

विषय

[अध्याय २ व ३ अपूर्ण]

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

श्रीमच्चिदंबरमंगलमूर्तयेनमः ॥ निर्विघ्नमस्तु ॥ श्रीमच्चिदंबरःकर्ता ॥ श्रीरस्तु ॥ ॐ श्रीचिदंबरगुरुनवविहारा ॥ जयजयाभक्तकामपूरा ॥ व्यापकतूंसर्वांतरा ॥ आनंदसागरातुजनमो ॥ १ ॥ तूंचब्रह्माविष्णुमहेश्वर ॥ गणपति सरस्वतीवागीश्वर ॥ तूंचिसद्गुरुवरचराचर ॥ तुजविणजगदीश्वरआननसे ॥ २ ॥ तुजनमितांजीसद्गुरु ॥ सकल सुरवरतुष्टतीअपारू ॥ ऐसेंजाणोनिमीनमस्कारू ॥ करितोंपरात्परूतुजलागीं ॥ ३ ॥ तुजनमितांसर्वारिष्ट ॥ नष्ट होतीभक्तांचेकष्ट ॥ ह्मणोनिकरुणाकरमीविस्पष्ट ॥ वदतांसंतुष्टहोवोनी ॥४॥ पूज्यजोत्रिभुवनामाझारी ॥ उद्भव ज्याठायींचराचरलहरी ॥ नाचतीलोपतीदेवींचिअंतरीं ॥ तोहृन्मंदिरस्थतूंसद्गुरु ॥५॥ ज्याच्याप्रीत्यर्थीविद्वज्जन ॥ वैराग्येंसन्यासपूर्वकआचरण ॥ करूनिविवरितीजेंपरपदगमन ॥ तेसद्गुरुचरणवंदितों ॥६॥ सत्यशांततेजोमूर्ति ॥ अविक्रयविमलज्याचीदीप्ति ॥ जोनित्यप्रेरकबुद्धिवृत्ति ॥ त्याचिदंबराप्रतिनमनमाझें ॥ ७ ॥ ज्याचियास्मरणेंविघ्नें पळती ॥ भजनींहोतसेस्थिरवृत्ति ॥ अगम्य[illegible]ते ॥ तोसरस्वतीपतिवंदितों ॥८॥ जोअसेसर्वांतें परदेवता ॥ तोचआमुचासद्गुरुमातापिता ॥ [illegible]भ्राताकुलदेवता ॥ भवार्णवत्राताआह्मांतें ॥९॥ तुजनमितां सद्गुरुराया ॥ बुद्धिदेशीगुणवर्णाया ॥ अगाध[illegible]या ॥ करिशीलदयादीनावरी ॥१०॥ कर्ताकर- वितातूंसमर्था ॥ तुजनमितांमूढहीज्ञाता ॥ हो[illegible]वर्ता ॥ शरणकृपावंतातुजआलों ॥११॥ आतांमाझे हृदयमंदिरांत ॥ बैसोनितुवांचिनिश्चित ॥ [illegible]रित ॥ करूनिनिमित्तमात्रमजलागीं ॥ १२ ॥ ऐसें स्तवितांचिदंबरनाथ ॥ दासाचेहृदयींहोऊनिव्यक्त ॥ निजचरितआपणचिसमर्थ ॥ आरंभकरितअत्यादरें ॥१३॥ शंकरहरिसूर्यासी ॥ वंदूनिशक्तिगणपतीसी ॥ तैसेंचिगुरुकाशीनाथयाज्ञवल्क्यासी ॥ आरंभूंग्रंथासिसप्रेमें ॥१४॥ याचिदंबरचरित्रांत ॥ व्यक्तहोईलधर्मवेदोक्त ॥ उपनिषत्प्रतिपाद्यआत्मसिद्धांत ॥ प्राकृतजनार्थनिरूपिलासे ॥१५॥

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(2)

श्रोतृपापविध्वंसक ॥ कलिकल्मषसंहारक ॥ सद्यःशुभेच्छादायक ॥ सद्गुरुनायकचरित्रहें ॥१६॥ श्रीमद्वंद्य चिदंबरचरित्रीं ॥ दंभभयभक्तीनेंहीजरी ॥ जोकोणीमानवाविश्वासधरी ॥ सर्वसिद्धिवरीत्यालागीं ॥१७॥ श्रीमच्चिदंबरचरित्रपठती ॥ श्रवणकरितीकिंवानमितीही ॥ तत्काळत्यांचियापवित्रचित्तीं ॥ श्रीगुरुनाथनिवासकरी १८ श्रीमच्चिदंबरक्षेत्रप्रसिद्ध ॥ केंगेरीनामस्वतःसिद्ध ॥ शैवागममहोत्सवजगत्प्रसिद्ध ॥ होतसेतेथेंप्रतिवर्षी ॥१९॥ तोपहावयानारीनर ॥ सर्वदेशनिवासीजनअपार ॥ मिळालेअसंख्यातद्विजवर ॥ बहुतथोरपूर्वदेशस्थ ॥२०॥ पाहूनिआल्हादकशंकरोत्सव ॥ चिदंबरींठेवोनिप्रेमभाव ॥ भवभेषजचरित्रश्रवणास्तव ॥ अत्युत्सुकजाहले ॥२१॥ प्रातःस्नानकरूनिसमाहित ॥ प्रेमेंमानस–पूजाचारीत ॥ बैसलेश्रीचिदंबरध्यानकरित ॥ आद्यशिवनामजपतसप्र दिन ॥२२॥ ब्राह्मणभक्तिओळखोनी ॥ वृद्धब्राह्मणवेषधरूनी ॥ आलेसद्गुरुवरत्यास्थानीं ॥ ब्राह्मणसन्निधानीं सप्रेमें ॥२३॥ त्यांचेंतेजपाहूनिद्विजवर ॥ करितीअभ्युत्थाननमस्कार ॥ प्रार्थतिकरूनिअत्यादर ॥ वारंवार सप्रेमें ॥२४॥ स्वामीआपणकोठीलकोण ॥ अलौकिकतवस्वरूपलावण्य ॥ आनंदसागरींआमुचेंमन ॥ करितें स्नानपाहोनी ॥२५॥ याज्ञवल्क्यशुकदत्तात्रेय ॥ योगीशकिंवावामदेवसदय ॥ कोणआपणसांगागुरुराय ॥ वंदूं अभयपायआपुले ॥२६॥ ऐकोनिमुनिबोलेमधुरोत्तर ॥ मीतरीएकगरीबविप्रसाचार ॥ किन्निमित्तपुसतांआदरितां फार ॥ चिदंबरोत्सवार्थआलोंमी ॥२७॥ मगत्यासीबोलतीब्राह्मण ॥ चिदंबरगुरुचरित्रामृतपान ॥ करावया तृषितआह्मीद्विजजन ॥ पानआपणकरवावें ॥२८॥ जरीहेइच्छाहोयसफळ ॥ तरीकृतकृत्यआह्मीनिखिल ॥ ब्राह्मणवचनऐकूनिप्रेमळ ॥ भक्तवत्सलकायबोले ॥२९॥ अहोद्विजेंद्रतुह्मीभाग्यवंत ॥ श्रवणोत्सुकजेकींचिदंबर–कथामृत ॥ एतावत्कालभूमंडळांत ॥ कोणीमजप्रतनविचारिलें ॥३०॥ चिदंबराख्यानतंत्रबहुत ॥ मजअसेदृष्टश्रुत ॥





Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan Mumbai

2A

तेंयथामतितुह्माकथित ॥ सादरचित्तऐकावें ॥ ३१ ॥ ज्याच्यास्मरणेंजन्ममरण ॥ जरादिव्याधिहोयखंडन ॥
तुटोनिसंसारश्रमबंधन ॥ मानवगणमुक्तहोय ॥३२॥ आतांसोडोनिकलिकालभय ॥ प्रापंचिकतळमळहायहाय ॥
एकाग्रचित्तहोऊनिनिर्भय ॥ चरित्रश्रवणसवयलावावी ॥ ३३ ॥ द्विजहोधर्महानिकलियुगीं ॥ होतसेवारंवारया
लागीं ॥ सर्वेशअवतारधरोनिजगीं ॥ धर्मसंरक्षणकरितोकीं ॥३४॥ भविष्यकलिवर्णनींव्यास ॥ ऐसेंसांगेंस्व–
शिष्यांस ॥ कींअवतारश्रीमहेशास ॥ वारंवारयेणेंलागे ॥ ३५ ॥ कलियुगारंभापासून ॥ जेजेशिवावतार
झालेजाण ॥ सांगतसेंतुह्मातेतेखूण ॥ धर्मसंस्थापनजेणेंझालें ॥३६॥ प्रबळजहालेंजैनमत ॥ लोपलेंसर्वकर्मवे-
दोक्त ॥ तेव्हांशैवभट्टपादनामांकित ॥ होऊनिवेदमतस्थापिलें ॥३७॥ अद्वैतमार्गउद्धारार्थ ॥ शंकरदुजाअव-
तारचरित ॥ नामेंशंकराचार्यविख्यात ॥ द्वैतांधकारउडविला ॥ ३८ ॥ त्याचाशिष्यविख्यातमंडन ॥ आचा–
र्यभाष्यींवार्तिककथन ॥ करोनिअद्वैतसंस्थापन ॥ दृढीकरणकरितसे ॥३९॥ कर्मकांडींअन्यार्थजाणोन ॥
हरआपणविद्यारण्यहोवोन ॥ चाऱ्हीवेदांवरतीभाष्यकरून ॥ वेदमार्गस्थापिला ॥४०॥ प्रभाकरदीक्षितविख्या-
त ॥ वेदमार्गपरंपरागत ॥ संस्थापनकरूनिशिवसिद्धांत ॥ सशरीरगुप्तजाहला ॥४१॥ मगहोऊनिअप्पय्यादी–
क्षित ॥ धर्ममार्गदावोनियांबहुत ॥ ऊर्जितदशेसीशैवसिद्धांत ॥ आणिलेवादिमतखंडोनी ॥४२॥ श्रीपादश्री-
वल्लभकुरवपुरीं ॥ प्रख्यातजाहलेमाहिवरी ॥ धर्मसंस्थापनबहुतांपरी ॥ केलेंत्याचारयाजगीं ॥४३॥ नृसिंहस्वा-
मीचेंरसाळचरित ॥ श्रीगुरुचरित्रनामेंप्रख्यात ॥ तेंपाहतांशिवावतारनिश्चित ॥ कळोंयेईलसर्वांसी ॥ ४४ ॥
पंपाक्षेत्रींविष्णुनामा ॥ धर्मसंस्थापनेचियाकामा ॥ दावोनियांअघटितमहिमा ॥ तुंगातीरींगुप्तझाले ॥ ४५ ॥
त्याचपरीआतांचिदंबर ॥ आद्यनामेंधरोनिअवतार ॥ अगाधमहिमादाविलामहीवर ॥ सद्गुरूपरात्परसर्वांसि–

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(3)

तो ॥४६॥ ज्याचेंचरित्रश्रवणींपडतां ॥ विरूनिजातसेभवव्यथा ॥ इहासुत्रअखंडिततत्वता ॥ सौख्यसाध्यता-
लाभहोय ॥४७॥ सकलमनकामनासाधती ॥ चिदंबरींविश्वासज्याचेचित्तीं ॥ मोक्षश्रीत्याच्यापायींलागती ॥
निरायासगतियेवोनी ॥ ४८ ॥ मुनीश्वरद्विजेंद्रसंवाद ॥ कैवल्यकिंकरऐकोनिविशद ॥ करीतसेजरीमतिमंद ॥
चिदंबरपदारविंदवंदूनी ॥४९॥ स्वस्तिश्रीचिदंबरचरित ॥ ऐकतांतुष्टेलसद्गुरुनाथ ॥ श्रवणकराहोचिदंबरभक्त ॥
प्रथमोऽध्यायस्वादुतरहा ॥ ५० ॥ श्रीसाचिदंबरार्पणमस्तु. ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

प्रथमोऽध्याय समाप्तः

" Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

श्रीचिदंबरगुरुमूर्तयेनमः ॥ श्रीमाचिदंबरःकर्ता ॥ श्रीरस्तु ॥ जयजयसद्गुरुकल्पवृक्षा ॥ कृपासागराअंतरसा-
क्षा ॥ करितीभक्तजीजीअपेक्षा ॥ पूरकदीक्षाधरियेली ॥ १ ॥ परीकल्पवृक्षातळींबैसल्यावर ॥ कल्पनारूप-
सिद्धिपावतोनर ॥ तुजस्मरतांहीराहोनिदूर ॥ धांवसीसद्गुरुवरतेथेंही ॥ २ ॥ जयजयअनाथनाथाचिदंबरा ॥
दीनबंधुकरुणासागरा ॥ जयजयाजीजगदोद्धारा ॥ भक्ताभीष्टकरासुखमूर्ति ॥ ३ ॥ निश्चयकरोनिसद्गुरुनाथा ॥
श्रीचरणींठेवोनियांमाथा ॥ प्रवर्तलोंचिदंबरकथा ॥ वर्णावयामतिमंद ॥ ४ ॥ कृपाकरोनिदीनावरी ॥ ग्रंथ-
सिद्धीसनेईलवकरी ॥ हेंचिमागतोंमीपरोपरी ॥ जीवअधीरीहोवोनी ॥ ५ ॥ ऐकाभाविकजनसमस्त ॥ गता-
ध्यायींचिदंबरकथामृत ॥ पाजवोनिमुनीश्वरकर्णतृप्त ॥ सिद्धझालेसर्वांसी ॥ ६ ॥ मगप्रणामकरूनिद्विजवर ॥
मुनीश्वराप्रार्थितीजोडुनिकर ॥ हाचिदंबरअवतारसाचार ॥ कवणदेववरप्रगटला ॥ ७ ॥ चिदंबरहाकवणवंशीं ॥
घेताझालाअवतारासी ॥ याचेअलौकिकआचरणती ॥ कथसआह्मासीकरावें ॥ ८ ॥ ज्याचेकीर्तीनेंत्रिभुव-
न ॥ सर्वत्रआच्छादिलेंपूर्ण ॥ तोहाशंकरकींनारायण ॥ सांगावेंनिरूपणकरावें ॥ ९ ॥ ऐकोनिविप्रांचीविन-
णी ॥ संतोषेमुनीश्वरमनीं ॥ कायबोलिलासद्गुणखाणी ॥ चिदंबरचरणींवंदूनी ॥ १० ॥ बहुतमातलाकलि-
राज ॥ सद्धर्महोतानिर्बीज ॥ धरणीसांगावयानिजकाज ॥ पातलीसहजेंपरमेशासी ॥ ११ ॥ गोरूपधरूनीकै-
लासासी ॥ जाऊनीआक्रोशीशंकरार्शी ॥ अधर्मिष्टांचेंभारमजसी ॥ जाहलेबहुवसीगुरुराया ॥ १२ ॥ हृद्गत-
चंद्रशेखरओळखोनी ॥ अशरीरवाचेबोलिलाअवनी ॥ जागेनिश्चिंतवसेंमनीं ॥ तुझीकहाणीजाणतों ॥ १३ ॥
तपस्वीमार्तंडदीक्षित ॥ धर्माचरणींदक्षसांप्रत ॥ त्याचापुत्रहोऊनिअवचित ॥ वेदसंमतधर्मस्थापीन ॥ १४ ॥
धरणीआनंदोनीपरतली ॥ परमेशध्यानकरितराहिली ॥ तोंदीक्षितभवनींअवतरली ॥ कृपासाउलीचिदंबरमूर्ति १५

सद्धर्मआणिभक्तरक्षण ॥ नित्यश्रौतकर्मआचरण ॥ अनादिवेदमार्गसंरक्षण ॥ हेंचिमुख्याचरणचिदंबरीं ॥१६
शिवावतारह्मणतीकोणीयासी ॥ कोणीयासीह्मणतीहृषीकेशी ॥ परीजोमूळसर्वहीदेवांसी ॥ गुणातीतगुणराशीपरब्रह्म ॥ १७ ॥ एतदर्थीव्यासवचनपुराणांतरीं ॥ कथाअसेअतिकुसरी ॥ ऐकासांगतोंहोनिर्धारी ॥ निश्चयसर्वांतरींठेवोनी ॥१८॥ वसुदेवदेवकीएकेकाळीं ॥ बोललींश्रीकृष्णाप्रती ॥ कंटकाग्रींपूर्वीनिश्चिती ॥ बहुतारीतितपकेलें ॥१९॥ सप्तजन्मींतूंपुत्रव्हावेंह्मणून ॥ तपआचरितांतुजकष्टाउपजून ॥ कृपाळूजाहलासभिक्ताधीन ॥ स्वरूपस्वीकारूनपुत्राचें ॥ २०॥ परीतुझेंबाल्यगोकुळींगेलें ॥ तारुण्यहस्तिनापुरींहरपलें ॥ बाल्यतारुण्यचरित्रनपाहिलें ॥ नयननिवलेंआमुचे ॥२१॥ असुनिपुत्रतुजसारिखा ॥ अनुभविलेंनाहींपुत्रहरिखा ॥ निष्फलझालेमनोरथदेखा ॥ श्रीहरिसखाकारितांही ॥ २२ ॥ ऐकोनिमातापितयांचीवाणी ॥ सोत्कंठबोलेचक्रपाणी ॥ मकरावीतुह्मींचिंतामनीं ॥ मद्रचस्मरणींअसोंद्या ॥ २३ ॥ कालियुगींआपणव्याघ्रपुरीं ॥ घोरतपआचरालमहीवरी ॥ घेईनअवतारमीतदुपरी ॥ तुमचेउदरींनिश्चयें ॥ २४ ॥ सत्यकरावयाहेंवचन ॥ जाहलाश्रीकृष्णदीक्षितनंदन ॥ करावयाभक्तमनरंजन ॥ चिदंबरअभिधानस्वीकारी ॥ २५ ॥ मार्तंडदीक्षिताचेंपूर्ववृत्त ॥ ऐकासांगतोंयथाश्रुत ॥ विजापूरप्रांतींगोठेग्रामांत ॥ असेशाश्वतज्योतिषवृत्ती ॥ २६ ॥ होराशास्त्रज्ञनागेश ॥ त्याचाहोतामूळपुरुष ॥ त्याचीपत्नीगंगानामेंविशेष ॥ पतिसेवेसीसादर ॥ २७ ॥ त्याचापुत्रनामेंशंकर ॥ पार्वतीतत्पत्निगुणसुंदर ॥ तत्तनयत्र्यंबकगुणसागर ॥ धुरंधरजोवेदशास्त्रीं ॥ २८ ॥ त्याकृष्णानामेंभार्यासत्य ॥ जाहलेतीतेंसद्दातनय ॥ त्यांतजोकींअसेकनीय ॥ उत्पत्तिनिलयतोसद्गुरूचें ॥२९ मार्तंडनामोंविख्यात ॥ जितेंद्रियपितृशुश्रुषणींरत ॥ शिवभक्तजोजीवन्मुक्त ॥ संसारींविरक्तवृत्तीचा ॥ ३० ॥

"A Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(5A)

एकदांत्याचेअंतरीं ॥ ज्योतिर्वृत्तीचात्रासभारी ॥ उपजोनिबहुविचारकरी ॥ बहुतांपरीअनुतापें ॥ ३१ ॥
आमुचेजिणेंपराधीन ॥ त्यांतहीदुष्प्रतिग्रहदान ॥ प्रत्यहींदुरन्नभोजनादिकरून ॥ त्रासलेंमनफारहें ॥ ३२ ॥
पापसंग्रहहोयअपार ॥ येरीतीअनुतापोनिफार ॥ निघालानिजसदनाबाहेर ॥ काशीपुरापातला ॥ ३३ ॥
तेथेंस्वप्रकाशनामक ॥ ब्रह्मनिष्ठसन्यासीअसेएक ॥ त्याचेंव्हातत्वस्वीकारूनिदेख ॥ एकनिष्ठसम्यक्सेवाक-
री ॥ ३४ ॥ आदौशतपथब्राह्मण ॥ अभ्यासिलेंवाजकडोन ॥ मुगत्याचियाकृपेंश्रुतिशास्त्रींजाण ॥ अत्यं-
तनिपुणजाहला ॥ ३५ ॥ गुरूनेंआज्ञादेतांजाण ॥ मुरगोडींपातलाशिष्यजाण ॥ गृहस्थाश्रमसंपादीपरिपूर्ण ॥
वेदोक्ताचरणसांभाळी ॥ ३६ ॥ शांतदांततपोदक्ष ॥ अग्निहोत्रीनिरपेक्ष ॥ केलासोमयागश्रुतिपक्ष ॥ एका-
ग्रलक्षलावोनी ॥३७॥ बहुतांशिष्यसंपादिले ॥ शास्त्रार्थीजयककेले ॥ सूत्रभाष्यानुसारेंचालविले ॥ प्रयोग-
हीषोडश ॥ ३८ ॥ श्रौतप्रयोगहीसीमावधि ॥ केलेंकेवळपरोपकारबुद्धि ॥ दाविलीबहुतासीअद्भुतसिद्धी ॥
परहितार्थगुरुकृपें ॥ ३९ ॥ परीअपत्यलाभदीक्षितासी ॥ नव्हायतेणेंदुःखपत्नीसी ॥ दुश्चितनारीनसावीकवणा-
सी ॥ ह्मणोनिसुतप्राप्तीसीनिघाला ॥ ४० ॥ प्रथमआलातुगोंलक्षेत्रासी ॥ पूजाप्रार्थनाकरीसोमनाथासी ॥
आरंभिलेंगायत्रीपुरश्चरणासी ॥ नेमनिष्ठअसतांसीराहोनी ॥ ४१ ॥ तेथेंकेलींपुरश्चरणेंतीन ॥ पुढेंसुब्बापुरक्षेत्रीं-
येऊन ॥ स्वप्रकाशेश्वरलिंगाचेंस्थापन ॥ समुत्साहमनेंपैंकेलें ॥ ४२ ॥ अश्वत्थआम्रवृक्षवापीसी ॥ संस्थापन-
करूनिप्रासादासी ॥ एकसंवत्सरतपोराशी ॥ करीअनुष्ठानासीत्याठायीं ॥ ४३ ॥ मगमार्तंडक्षेत्रहिप्परीगांव ॥
जावोनितेथेंदीक्षितराव ॥ विधियुक्तपूजोनिस्वयमेव ॥ करीपुरश्चरणवेदमातेचें ॥४४॥ षण्मासहोतांअनुष्ठान ॥
बोलेमार्तंडस्वप्नींयेऊन ॥ तपतुझेंसिद्धझालेंजाण ॥ तुझेंअभीष्टजाणतों ॥ ४५ ॥ संततीनिमित्तकरिसीचिंता ॥

Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(6)



परीसत्यसांगतोंतुजआतां ॥ येथूनिदक्षिणेसीतत्वता ॥ असेचिदंबरनामक्षेत्र ॥४६॥ आकाशलिंगपंचसभातेथ ॥ असेगायत्रीग्रामविख्यात ॥ उपमन्युव्याघ्रपादकण्वादितेथ ॥ भक्तप्रख्यातवरलाधले ॥ ४७ ॥ क्षीराब्धिकावेरी शिवगांग ॥ तीर्थेंअसतीतेथेंचांग ॥ विष्णुब्रह्मादिकदेवदंग ॥ जाहलेअभंगज्याठायीं ॥ ४८ ॥ साक्षाचिदंबर भक्तवत्सल ॥ स्वयेंतेथराहोनिअखिल ॥ भक्ताभीष्टदेईसार्वकाळ ॥ पुरवीकनवाळदीनाचा ॥ ४९ ॥ क्षेत्रमहि-मानकायवर्णूं ॥ स्वयंभूस्थानभक्तकामधेनु ॥ तपेभूमिपापांधकारभानू ॥ अनुपमगुणुमहीवरी ॥ ५० ॥ याचें माहात्म्यआद्यंत ॥ स्कंदपुराणींकेलेंव्यक्त ॥ श्रीमान्व्यासमुनिप्रणीत ॥ तेहेंगुप्तक्षेत्रभूमीवरी ॥ ५१ ॥ मार्त-डेश्वरआज्ञाकरीयासी ॥ जावेंत्वांचिदंबरक्षेत्रासी ॥ चिदंबरप्रसन्नहोऊनिसंतोषीं ॥ तुमचीकुशीपावित्रकरी ५२ ऐसेंबोलोनिअंतर्धान ॥ पावतांदीक्षितजागृतहोऊन ॥ प्रातर्नित्यक्रियासारून ॥ प्रसादघेऊननिघाला ॥ ५३ ॥ मार्गींपाहेस्कंदपुराण ॥ त्यांतअनुपमक्षेत्रवर्णन ॥ वाचूनिधालेंयाचेंमन ॥ सदारगमनकरीतसे ॥ ५४ ॥ क्षेत्र-महिमानविप्रसमस्त ॥ सांगतांभासेलअत्यद्भुत ॥ पृथ्वीपतिराजारोगेंव्याप्त ॥ तीर्थेंकरीताफिरतसे ॥ ५५ ॥ ग-लितकुष्टसर्वांगींजाण ॥ दुर्गंधिसुटेव्याकुळप्राण ॥ पृथ्वीनेंबहुततीर्थेंफिरून ॥ होयउदासीनचक्रवर्ती ॥ ५६ ॥ युगचौकडियायुगयुगांतर ॥ गुप्तप्रगटदिसेपृथ्वीवर ॥ आकाशलिंगनिराकार ॥ ईश्वरावतारतेथूनी ॥ ५७ ॥ सेतुबंधरामेश्वरमात्रराहिला ॥ राजाप्राणघायासिद्धझाला ॥ तेंथजावेंहानिश्चयकेला ॥ पादचारीझालाचक्रवर्ती ५८ रामेश्वरासीजाणेंअसे ॥ ससैन्यचक्रवर्तीचालतसे ॥ चित्तींउद्विग्नचिंताकरीतसे ॥ उपेक्षिलेंकैसेंईश्वरें ॥ ५९ ॥ सैन्यासहितउतरलावनींजाण ॥ पश्चिमाब्धिउरलादीडयोजन ॥ राजाराहेमुक्कामकरून ॥ एकांतींखिन्नचित्तबैसे ॥ ६० ॥ एकांतींबैसलाअरण्यासी ॥ माध्यान्हीऔदुंबरछायेसी ॥ समीपजलकर्दमासी ॥ राजादृष्टीसीपाहत-



Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(6A)

श्रीमच्चिदंबरोजयतु ॥ ॐ नमोजीचिदंबरसद्गुरु ॥ भवसिंधुपात्रींजोतूंतारूं ॥ तवनामस्मरणहाचिनोरू ॥
देईउतारूदासहा ॥ १ ॥ इतुल्यानेंचहोऊनिसंतुष्ट ॥ वारिशीलभक्तांचेभवकष्ट ॥ अनुवादतीयापरीओष्ठ ॥
जगच्छ्रेष्ठसज्जनाचे ॥ २ ॥ तुजनमितांहीमतिमंद ॥ करितीउपनिषदार्थसंवाद ॥ ऐकिलात्वत्कृपौघअगाध ॥
ह्मणोनिपदस्वादइच्छितों ॥ ३ ॥ दीक्षिततपानेंतुष्टहोसी ॥ दिधलेंप्रत्यक्षदर्शनत्यासी ॥ प्रेमभरेंआलासीत्याचे
कुशी ॥ त्यातुजसींनमनमाझें ॥ ४ ॥ आतांश्रोतेंऐकासावधान ॥ मार्तंडदीक्षिताचेंशिवाराधान ॥ दृढभक्तीनें
चालविलेंअनुष्ठान ॥ करितोंकथनआद्यंत ॥ ५ ॥ ब्राह्ममुहूर्तींउठोन ॥ चिदंबरतीर्थींस्नानकरून ॥ आवश्यक
नित्यकर्मआटपोन ॥ शिवपूजनकरीतसे ॥ ६ ॥ भक्तिपूर्वकषोडशोपचारेंसी ॥ नित्यपूजीतसेशिवासी ॥ आ-
सनमांडूनिचैलाजिनकुशेसी ॥ पुरश्चरणासीआरंभी ॥ ७ ॥ ब्रह्मनिष्ठजितेंद्रिय ॥ सर्वांभूतींमानससदय ॥
चित्तींस्मरताचिदंबरपाय ॥ जपस्वाध्यायवेदमाता ॥ ८ ॥ मध्यान्हपर्यंतयाप्रकारें ॥ मंत्रजपेएकाग्रविचारें ॥
पुन्हास्नानपूजनादिक्रमवारें ॥ नित्यकर्मकरीतसे ॥ ९ ॥ तेथसूनिअस्तमानपर्यंत ॥ आसनमांडोनीयानिश्चित ॥
बैसेत्यावरीएकाग्रचित्त ॥ चिदंबरध्यानकरीतसे ॥ १० ॥ प्रदोषींकरूनीपुन्हास्नान ॥ महोपचारेंशंकरपूजन ॥
करोनीसाष्टांगनमन ॥ मगजपासीआरंभी ॥ ११ ॥ जपकरानिशादशघटी ॥ आसनसोडोनिउठाउठीं ॥ अर्ध
शेरदूर्वारसघोटी ॥ आनंदपोटींनसमाये ॥ १२ ॥ आनिशीथध्यानकरित ॥ कृष्णाजिनआस्तरोनिदेउळांत ॥ मग
निद्रायत्किंचित ॥ असेघेतविश्रांत्यर्थ ॥ १३ ॥ एवंघोरकरितांतपश्चरण ॥ जाहलेंएकसंवत्सरपूर्ण ॥ तेव्हां
चिदंबरसंतुष्टहोऊन ॥ दीक्षितासीदर्शनदीधलें ॥ १४ ॥ मध्यरात्रींचिदंबर ॥ उभाराहोनिदीक्षितासमोर ॥
हाकमारीऊठबासत्वर ॥ तुष्टलोंथोरतपपाहूनी ॥ १५ ॥ निर्विकल्पसमाधींतदीक्षित ॥ ध्यानकरितांझालाएकांत ॥

Joint project of the Rajawada Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(४)



तेथदेवहाकदेवोनिबोलत ॥ तेंश्रवणींनशिरततेधवां ॥ १६ ॥ करुणाब्धिचिदंबरेंकनुत्राळें ॥ निजहस्तेंमस्तकहा-
लविलें ॥ जाग्रतहोतांचिगडबडले ॥ प्रकाशितपाहिलेंमंदिर ॥ १७ ॥ नेत्रउघडोनिपाहतीदीक्षित ॥ तेजपस-
रिलेंसेअत्यद्भुत ॥ ज्यापुढेंसूर्यतेजहीलोपत ॥ दिव्यपाहततेजऐसें ॥ १८ ॥ दीक्षितसावधहोवोन ॥ समोरपा-
हतांपंचवदन ॥ दिसूंलागलाविराजमान ॥ आनंदघनचंद्रशेखर ॥ १९ ॥ दैदिप्यमानचंद्रसूर्याग्निनेत्र ॥ जटाजूट
शोभतीविचित्र ॥ दशभुजींदशायुधकर्पूरगात्र ॥ चिदंबरपवित्रशोभतसे ॥ २० ॥ भस्मोद्धूलितविलसेसर्वांग ॥
कंठींरुंडमाळाझळकेचांग ॥ मस्तकींवाहेमवाहगांग ॥ शोभतीअभंगसांबमूर्ति ॥ २१ ॥ रुद्राक्षमाळांनींआंगवेष्टि-
लें ॥ व्याघ्रचर्मअसेपरिधानकेलें ॥ नंदिराजवाहनींबैसले ॥ त्रिपुंड्रींशोभलेंललाट ॥ २२ ॥ त्रिभुवनसुंदरीज-
गन्माता ॥ सर्वालंकारलेवोनिअतौता ॥ वामांगीं[illegible]निबैसतां ॥ अपूर्वलावण्यताफांकली ॥ २३ ॥
त्रिशूलडमरूवामकरीं ॥ गजास्यचिरंजीवमांडीवरी ॥ नेत्रकटाक्षेंकृपालहरी ॥ प्रसन्नास्येंप्रेरीतसे ॥ २४ ॥
ब्रह्माविष्णुआदिसुरवर ॥ चिदंबरसेवेसीतत्पर ॥ सभोंवतीजोडोनीयांकर ॥ सादरहोऊनितिष्ठती ॥ २५ ॥
सप्तऋषीश्वरशिष्यांसमेत ॥ उपानिषद्ब्रह्मसूक्तेंसेवित ॥ अप्सरागणगंधर्वेंहीसेवित ॥ निजविग्रेंतचिदंबरा ॥२६॥
शंकरासीपाहोनिआनंदभरित ॥ होवोनिदीक्षितकरीदंडवत ॥ आनंदबाष्पेंचरणक्षालित ॥ मोकळ्याकेशेंपाय
झाडी ॥ २७ ॥ चिदंबरशरणागतवत्सल ॥ दीक्षितासीउठवीतत्काल ॥ मस्तकींहस्तठेवोनिविमल ॥ सप्रेम
गालहुंगीतसे ॥ २८ ॥ सर्वेंचिमस्तकआघ्राणोनी ॥ ह्मणेविप्रातुझेअंतःकरणीं ॥ जेंजेंवांच्छिततेंपुरवोनी ॥
सुखीकरीननिश्चयें ॥ २९ ॥ आनंदसागरींमग्नतापसी ॥ बोलेसविनयशंकरासी ॥ देशीतरीपादसेवनमजसीं ॥
अखंडितादिवानिशीअसावें ॥ ३० ॥ चिदंबरमगबोलेहांसोन ॥ कांझालेंसुतेच्छाविस्मरण ॥ ज्याकरितांतुवांतप

Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

केलेंदारुण ॥ तेंकारणनाठवसी ॥ ३१ ॥ स्मरणहोवोनिद्विजवर ॥ परमेशासिदेतउत्तर ॥ तुजसारिखापुत्रसा-
चार ॥ देकृपाकरदयाळा ॥ ३२ ॥ दीक्षितासीसांगेनिजगुज ॥ धर्मरक्षणकरणेंआहेमज ॥ एकपंथदोकाज ॥
तुझियाइच्छेपुरतील ॥ ३३ ॥ यास्तवतुझापुत्रहोईन ॥ करीनसद्धर्मसंरक्षण ॥ लोकोद्धारककीर्तिपूर्ण ॥ विस्ता
रीनत्रिभुवनीं ॥ ३४ ॥ दीक्षितमागेअभिवचन ॥ बाळरूपेंजन्मालआपण ॥ तेव्हांव्हावेंआपुलेंस्मरण ॥ हीच
भाकआणअसावी ॥ ३५ ॥ चिदंबरसांगेदीक्षितासी ॥ जन्मतांमाझ्यादक्षिणकर्णींपाहसी ॥ शुभ्राक्षताबिल्व–
मंजरीसी ॥ स्मरणचित्तींअसोंद्या ॥ ३६ ॥ ऐसेंबोलोनिअंतर्धान ॥ शंकरपावलासपरिवारगण ॥ दीक्षित
चित्तींआनंदपावोन ॥ करीनमनअत्यादरें ॥ ३७ ॥ तपसाङ्गकथायादुसरेदिनीं ॥ ब्राह्मणांतर्पिलेंसुग्रासभोजनीं ॥
ह्मणेअत्यानंदेंसर्वांप्रार्थुनी ॥ चिदंबरदर्शनींपावनझालों ॥ ३८ ॥ वरप्रसादसांगेभार्येसी ॥ ह्मणेचलजाऊंस्वग्रा-
मासी ॥ पूजाप्रणामकरीचिदंबरासी ॥ निजभवनासीपातला ॥ ३९ ॥ नित्यकर्मआचरितांसदनीं ॥ शिवा–
नुग्रहसमयप्राप्तएकेदिनीं ॥ ऋतुमतिझालीतयाचीपत्नि ॥ लक्ष्मीवयागर्भिणीईशकृपें ॥ ४० ॥ मार्तंडदीक्षितचिदं-
बरचरण ॥ स्मरोनिस्ववीर्यतीसजाण ॥ सुमुहूर्तशुभदिननक्षत्रजाण ॥ देवोनिसंतुष्टमनकरितसे ॥ ४१ ॥ चिदं-
बरतेजपोटींयेतां ॥ अद्भुतशोभेलक्ष्मीमाता ॥ प्रियेचीमुखकांतिपहातां ॥ आनंदवार्तासांगतसे ॥ ४२ ॥ लो-
कोत्तरजियेच्यादोहदासी ॥ ऐकाहोद्विजेंद्रआनंदेंसी ॥ सद्गुरुसमाधानक्षांतिमानसी ॥ प्रियवचनासीबोलतसे ४३
नेत्रझांकोनिअंतर्ज्योति ॥ पाहतांप्रेमजयेचेचित्तीं ॥ वाढतसेदिनरात्रीं ॥ रोमांचनिघतीसर्वांगीं ॥ ४४ ॥
चिदंबरावांचोनिलक्ष्मीसती ॥ आननाठवीतसेचित्तीं ॥ अखंडध्यानकरीतबैसेती ॥ उद्गारनिघतीचिदंबर ॥ ४५ ॥
पुसेसतीसीदीक्षित ॥ दोहदकायमागेतुझेंचित्त ॥ पतिव्रताकांहींचनबोलेमात ॥ ऐक्यतापावतचिदंबरीं ॥ ४६ ॥

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan Mumbai

(8)



ब्रह्माहमास्मिअसेंवदनीं ॥ उच्चारीतसेक्षणोक्षणीं ॥ हेंपाहोनिदीक्षितस्वमनीं ॥ ह्मणेकायजाहलेंपत्नीतें ॥४७॥ अयेदीर्घध्यानकायकरिसी ॥ इच्छाकायतुझियेमानसीं ॥ विचारितांमातादीक्षितासी ॥ उत्तरऐसेंदेतअसे ॥४८॥ मीअसेंइच्छाविरहित ॥ पूर्णअलिप्तसर्वगत ॥ सर्वांसिनिदानिवंचित ॥ मीचएकस्वामीराया ॥४९॥ ऐको- निनिजकांतावचन ॥ दीक्षितकरीपुन्हाप्रश्न ॥ मागुतीवैराग्यधर्मज्ञाप्र ॥ ऐशींचवचनेंबोलिली ॥५०॥ मज नाहींकांहींचअपेक्षा ॥ करणेंअसेसद्धर्मरक्षा ॥ भक्तसंतोषणमुख्यकांक्षा ॥ स्वभावदीक्षाहेचिमाझी ॥५१॥ प्रतिदिनींऐसेंअद्वैत ॥ बोलोनिदंपतीकालक्रमित ॥ गर्भसंस्कारविधियुक्त ॥ करीतदीक्षितत्यायाकाळीं ५२ ऐसेंअसतांनवमासपूर्ती ॥ होऊनिकार्तिकमासषष्ठीतिथी ॥ आलीकृष्णपक्षीयनिश्चिती ॥ सुमुहूर्तसंमतिमिळा- ली ॥५३॥ श्रीवत्सगोत्रकण्वशाखेसी ॥ विख्यातमार्तंडदीक्षितवंशीं ॥ शकेसोळाशेंवरतीऐशीं ॥ चिदंबर- करुणाराशीजन्मला ॥५४॥ ग्रहपंचकस्वक्षेत्रीं असतां ॥ दशघटीदिवसदाखवीसावितां ॥ मकरलग्नउदयाये- तां ॥ चिदंबरकृपावंतप्रगटला ॥५५॥ मंदिरावरतीसुरवर ॥ पुष्पेंवर्षतीअपार ॥ ऐशासुदिनींनिजअवता- र ॥ श्रीचिदंबरेंप्रकटकेला ॥५६॥ प्रसवल्याविरहितमाता ॥ पुढेंबाळासिपाहेअवचिता ॥ तयींमूर्तिदिसेअ- त्यद्भुता ॥ बहुतअपूर्वतावाटली ॥५७॥ तेजोराशीहाप्रतिदिनकर ॥ श्यामसुंदरतनुसुकुमार ॥ अष्टवर्षात्मक मूर्तिपरिकर ॥ श्रीमान्चिदंबरदयानिधि ॥५८॥ दक्षिणश्रवणींबिल्वमंजरी ॥ शुभ्राक्षताविलसताहेशिरीं ॥ पाहोनिस्वरूपआनंदसागरीं ॥ पोहतेझालेदंपती ॥५९॥ पुन्हासावधहोवोनिदीक्षित ॥ निरखोनिपाहेचिन्ह पूर्वोक्त ॥ नमस्कारीकेवळदंडवत ॥ स्तोत्रअपारकरीतसे ॥६०॥ पुरविलीसवामाझीवासना ॥ कृपासागरा गिरिजारमणा ॥ पूर्वोक्तदाखविलीसखुणा ॥ स्वाभिवचनापूर्णकेलें ॥६१॥ तूंअससीषड्भावरहित ॥ भक्त



Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(8A)

श्रीसद्गुरुचिदंबरायनमः ॥ अनन्यभावेंस्मरतांज्यासी ॥ अंजनमिळेमायाभ्रमासी ॥ तत्कालमानवज्ञानराशी ॥
सुखसंतोषीहोतसे ॥ १ ॥ ऐसामहाराजयोगीश्वर ॥ श्रीचिदंबरमहेश्वर ॥ प्रगटझालासेमहीवर ॥ करुणासागर
नररूपें ॥ २ ॥ ब्राह्मणांसीह्मणेमुनीश्वर ॥ चित्तचैतन्यींव्हावेंसादर ॥ चिदंबरकथासुमनोहर ॥ ऐकतांसपरि-
वारसुखलाधे ॥ ३ ॥ जंवमातापाहेबाळासी ॥ दिसोलागलीतेजोराशी ॥ प्रभाफांकलीसूतिकागृहासी ॥ परम
विस्मयासीपावली ॥ ४ ॥ बालवेषधारीचिदंबर ॥ मंदहास्यकरीसुंदर ॥ विप्रवनिताकन्याकुमर ॥ सपरिवार
पातल्या ॥ ५ ॥ स्नानकरोनीगंगाजळीं ॥ आव्हानिलीब्राह्मणकुळी ॥ जातकरणादिविधिनिर्मळी ॥ दीक्षितें
संपादिलीशास्त्रपंथें ॥ ६ ॥ सवत्सधेनुगोप्रदानें ॥ सुवर्णरौप्यकछ्रदानें ॥ कार्पासऊर्णावस्त्रदानें ॥ सुप्रसन्नमनें
समर्पिलीं ॥ ७ ॥ यथाविधिपूजिलेभूसुर ॥ म्हणेस्वामीअल्पउपकार ॥ आजीजाहलेदीनावर ॥ चरणकिंकरमी
असें ॥ ८ ॥ तोंपातलेजोतिर्वेत्ते ॥ पाहतीलग्नमुहूर्तातें ॥ कथितजाहलेजातकातें ॥ मातापित्यातेंतोषविती ॥ ९ ॥
लोकोद्धारकहोईलबाळ ॥ वेषधारीउमावेल्हाळ ॥ लोकांसुपरमार्थजाश्वनीळ ॥ अवतरलाकृपाळभूवरी ॥ १० ॥
आलेतत्क्षणींसामुद्रिक ॥ बाळकापाहोनिकरितीकौतुक ॥ त्याहाळोनीआपादमस्तक ॥ चिन्हेंअलौलिकवाखा-
णिती ॥ ११ ॥ स्वयंसिद्धमहापुरुष ॥ हाबाळजगद्गुरुमहेश ॥ आचंद्रार्कज्याचेंयश ॥ प्रगटेविशेषभूमंडळीं ॥ १२ ॥
भविष्यसांगोनीज्योतिर्वेत्ते ॥ गेलेआपुलियास्वस्थळातें ॥ मांगब्राह्मणींदेवतासूक्तें ॥ वेदोक्तमंत्रेंआरभिलीं ॥ १३ ॥
तदुपरीतेहीब्राह्मण ॥ दीक्षिताज्ञाघेऊनिसुजाण ॥ जातीस्वगृहींसुप्रसन्न ॥ पुत्रसुलक्षणपाहोनी ॥ १४ ॥
वार्ताप्रगटलीग्रामांत ॥ नरनारीधांवल्यासमस्त ॥ दर्शनेंजाहल्यापुनित ॥ थोरभाग्यवंतह्मणोतयां ॥ १५ ॥
महादानंदींएकादशदिन ॥ महोत्सवींगेलेउलटोन ॥ द्वादशींसिद्धारीचक्रअवलोकुन ॥ अभिधानाचिदंबरठेविलें ॥ १६

पुराणपुरुषसच्चिदानंद ॥ विज्ञानमूर्तिपरमसुखद ॥ केवलपरब्रह्मआनंदकंद ॥ चिदंबरअनुवादनामार्थीं ॥ १७ ॥
वाखाणिलाअठरापुराणीं ॥ श्रुतिस्मृत्यादिशास्त्रप्रमाणीं ॥ तत्ववेत्त्यादिकींऋषिगणीं ॥ स्तविलासुरगणींचिदं-
बर ॥ १८ ॥ दिवसादिवशींकुमारेंद्र ॥ वाढेजैसाशुक्लचंद्र ॥ प्रत्यक्षप्रगटलासेयादवेंद्र ॥ करुणासमुद्रभाविकां-
चा ॥ १९ ॥ दाखवीबाललीलाकौतुक ॥ पूर्णझालासंवत्सरएक ॥ मातापितरांपरमोल्हादक ॥ जन्मदिवस-
सम्यकपातला ॥ २० ॥ वाढदिवशींआनंदथोर ॥ पिताउत्सवकरीअपार ॥ बालकांपक्वान्नेंमधुररुचिकर ॥
वस्त्रालंकारसमर्पिले ॥ २१ ॥ ब्राह्मणसुवासिनीसंतर्पणा ॥ करूनिदिधल्याभोजनदक्षणा ॥ देऊनिवस्त्रपात्रा-
दिप्रावरणा ॥ याचकगणातृप्तकेलें ॥ २२ ॥ द्वितीयसंवत्सरींचिदंबरें ॥ चरित्रेंदाविलींअपारें ॥ अवलोको-
निमातापितरें ॥ हर्षनिर्भरेंसुखावती ॥ २३ ॥ बालवेषधारीमहादेव ॥ खेळखेळतसेअपूर्व ॥ दाखवीमातेसी-
निजवैभव ॥ बालभावपरोपरी ॥ २४ ॥ नित्यतृप्तनिराकार ॥ भक्तमनोरथाकारणेंसाकार ॥ होऊनिसमुत्सु-
कअपार ॥ स्तनपानचिदंबरकरीतसे ॥ २५ ॥ कधींमातागृहकृत्यासी ॥ गुंततांविसरपडेतीसीं ॥ रडतरडत-
धांवेपाठिसीं ॥ मातामोहेसींउचंबळे ॥ २६ ॥ लक्ष्मीमातेच्यापूर्वसुकृतें ॥ कोटिजन्माच्यापुण्यपर्वतें ॥ मान-
वदेहींप्रगटोनिकृपावंतें ॥ बाललीलांतदाविल ॥ २७ ॥ बोबडेबोलमधुरसुंदर ॥ मंजुलध्वनिकंठसुस्वर ॥ प-
रिसुनीमातापितयांअपार ॥ हर्षनिर्भरनसाहवे ॥ २८ ॥ ब्रह्मेंद्रादिदेवतागण ॥ वसिष्ठपाराशरादिऋषिगण ॥
व्यासवाल्मिकादिभगवज्जन ॥ करितीस्तवनअत्यादरें ॥ २९ ॥ तोहायज्ञरूपीजनार्दन ॥ दीक्षितकुळींअवतरो-
न ॥ बालरूपेंकरीस्तनपान ॥ सामान्यभोजनप्रीतीनें ॥ ३० ॥ कायवर्णूतयांचेंभाग्य ॥ ज्यांपुढेंब्रह्मादिकहीं-
अभाग्य ॥ प्रेमळभक्तचिएकयोग्य ॥ तेथयोग्यायोग्यनचपाहे ॥ ३१ ॥ पात्रींवाढितांपड्रसान्न ॥ नजेवितां-

(१४)

चीजायपळोन ॥ चपलविद्युलतेसमान ॥ अडवितांकवणानसांपडे ॥ ३२ ॥ शोधकरूनीअवलोकितां ॥ पु-
त्रासंबोखितसेमाता ॥ येईबाळागुणवंता ॥ त्वांजेवितांतृप्तिआह्मां ॥ ३३ ॥ तोंनह्मणोनीहांसेदिगंबरू ॥
कींजोदुसराअनुसुयाकुमरू ॥ ज्याचामहिमागातांअपारू ॥ नारदतुंबरूभागले ॥ ३४ ॥ बाळह्मणेमातेतें ॥
आपणनयेईभोजनातें ॥ मगबळात्कारेंबाळातें ॥ भोजनगृहातेंनेतसे ॥ ३५ ॥ हातींघेऊनियांकवळ ॥ ह्मणेबा-
ळाउघडींमुखकमळ ॥ क्षुधेनेंझालासिव्याकुळ ॥ धर्मलोळपुष्ठलागे ॥ ३६ ॥ आग्रहेंमुखउघडीबालक ॥ तयां-
तदिसतीब्रह्मांडेंअनेक ॥ पाहूनिमूर्छापावलीक्षणैक ॥ हेनुमानाशिक्कावसरली ॥ ३७ ॥ चंद्रसूर्यतारागणा ॥
ब्रह्मांडरचनासंपूर्णा ॥ भूमिस्वर्गपाताळजाणा ॥ अपूर्वघटणापाहतसे ॥ ३८ ॥ पूर्वीअर्जुनासिभगवंतें ॥ वि-
राटस्वरूपदाविलेंहोतें ॥ त्याचपरीकृपावंतें ॥ निजमातेतेंदाविलें ॥ ३९ ॥ सप्तकंचुकभूमंडळ ॥ त्यांतपाहेस्व-
देशकेवळ ॥ स्वग्रामआणिस्वस्थळ ॥ [illegible] ॥ ४० ॥ तटस्थजाहलीविस्मयहोउन ॥ ह्मणें-
कुमरनोहेहापंचवदन ॥ शिवगुरुज्ञानचिद्घन ॥ चरणींनमनकरीतसे ॥ ४१ ॥ मातामोहेंव्यापिलीसुंदरी ॥
पुत्राकवळूनिचुंबनकरी ॥ प्रेमशब्देंबहुतसांवरी ॥ स्तवितपरोपरीकरीतसे ॥ ४२ ॥ बाळासीह्मणेतेअवसरीं ॥
तूंचीईश्वरअवतारी ॥ आह्मांअभाग्यांच्यापरीं ॥ अवचितांकामारीप्रगटलासी ॥ ४३ ॥ निधानलाधलेंआ-
ह्मासी ॥ जेंनलाभेब्रह्मादिकांसी ॥ महंतसिद्धतापसियांसी ॥ अष्टसिद्धींसीअलभ्य ॥ ४४ ॥ मगजाऊनि-
सांगेपतीतें ॥ आपणपाहिल्याप्रतीतीतें ॥ तेंह्मणतीदीक्षितसतीतें ॥ ईश्वरतूंतेंप्रसंन्न ॥ ४५ ॥ नरनव्हेहाना-
रायण ॥ चित्स्वरूपीउमारमण ॥ अंबरहेंघटाभिधान ॥ स्वामीनिरंजनजगद्गुरु ॥ ४६ ॥ मगस्तौत्यकरूनीब-
हुतांपरी ॥ प्रेमेंआळवितीत्रिपुरारी ॥ मातापितरेंत्याअवसरीं ॥ ह्मणतीपरोपरीविनवोनियां ॥ ४७ ॥

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(10)



कीर्तिकरोनियांबहुवसी ॥ याचवेळींजरीप्रगटसी ॥ तरीआह्माअनाथांसी ॥ नलभसीऐसेंवाटतें ॥ ४८ ॥
तरीस्वल्पदिवसगुप्तरूपेंसी ॥ रहावेंआमुच्यागृहासी ॥ मगप्रगटकरावेंस्वरूपासी ॥ वृद्धविनंतीसीपरियेसी ॥४९॥
मातापितयांचेंऐकूनिवचन ॥ तत्काळबाळकझालेजगज्जीवन ॥ देऊनिमातेसिदृढालिंगन ॥ स्तनपानप्रेमेंकरित-
से ॥ ५० ॥ यापरीअगाधचरित्रें ॥ बाळदाखवीअतिविचित्र ॥ संतसज्जनकरितीस्तोत्रें ॥ पुण्यपात्रेंवाखा-
णिती ॥ ५१ ॥ वाढतांकुमरझालाथोर ॥ पंचमांवत्सरिकसुकुमार ॥ भोंवताघेऊनीशिशुपरिवार ॥ नाना-
प्रकारखेळतसे ॥५२॥ हमामाहुमरीचेंडूलगोरी ॥ खेळखेळतीपरोपरी ॥ पाठलागतीपरस्परीं ॥ हांवअंतरीं-
धरोनियां ॥५३॥ निजवयस्कबाळांसमवेत ॥ हांसेनाचेगायनकरीत ॥ पाहूनीबाललीलाअद्भुत ॥ होतीवि-
स्मितसमस्तजन ॥ ५४ ॥ कधींजाऊनिपितयापाशीं ॥ शास्त्रचर्चाकरीबहुवसी ॥ देऊनिवचनप्रमाणासी ॥
सिद्धांतासीदाखवी ॥ ५५ ॥ ज्याचेंस्वरूपअगोचर ॥ ब्रह्मादिकांसीनकळेपार ॥ अंगणींखेळतांअपर्णावर ॥
नरनारीपाहती ॥ ५६ ॥ सुंदरउटणीलावितीअंगा ॥ स्नानाकरवितीअभ्यंगा ॥ चरणांगुष्ठापासूनिगंगा ॥
त्रितापभंगासमुद्भवे ॥ ५७ ॥ तदुपरीकरितांचिमंगलस्नान ॥ करचरणकरितिप्रक्षालन ॥ अनंतरआसनींबैसवू-
न ॥ भाळींचंदनचर्चिती ॥ ५८ ॥ सुरम्यमालाघालितीगळां ॥ झगझगीतपीतांबरापिंवळा ॥ उपवस्त्रदेऊनि-
यांबाळा ॥ पाहतीडोळांधणीभरी ॥ ५९ ॥ मेरूमंदाराहिमाचल ॥ मायाकर्षणेंजाहलेअचल ॥ तोचिहाचिदं-
बरदयाळ ॥ चालतांबाळभिंतीधरी ॥६०॥ आब्रह्मस्तंभजीवमात्रांसी ॥ अन्नेंपुरवीअहर्निशीं ॥ तोचिदात्मा-
मातेपाशीं ॥ शाकान्नासीमागतसे ॥ ६१ ॥ अनन्यभावेंकरितिभजन ॥ ऐसेजेकांभगवज्जन ॥ तयाभाविकां-
चेआधीन ॥ स्वामीनिरंजनजगद्गुरू ॥ ६२ ॥ ब्रह्मरूपेंभरलेंअंबरू ॥ तोहाचिदंशेंचिदंबरू ॥ जोधर्मसंरक्षणा-

(10A)





आधार ॥ करीपरिहारअधर्माचा ॥ ६३ ॥ तोंदीक्षितकुळींदुजियाकुमरें ॥ जन्मघेतलाप्रभाकरें ॥ अग्रजव्हा- वेंचिदंबरें ॥ सद्गुणागारेंह्मणोनियां ॥ ६४ ॥ दुजापुत्रशेषावतार ॥ परमसुलक्षणगुणगंभीर ॥ जन्मपावला- सुमित्राकुमर ॥ धरणीधरकालियुगीं ॥ ६५ ॥ आणिकजाहलीकन्याजाणा ॥ शेषानामेंसुलक्षणा ॥ बालकां- च्यापाहूनिलक्षणा ॥ विचक्षणाभूलपडे ॥ ६६ ॥ परस्परेंप्रीतीनियुक्त ॥ खेळखेळतीसुयुक्त ॥ चित्तकरूनि- प्रेमासक्त ॥ सच्चिदानंदभक्तअवलोकिती ॥ ६७ ॥ त्रेतींलक्ष्मणआणिरघुवीर ॥ द्वापारींबलिभद्रनंदकिशोर ॥ तैसेप्रभाकराचिदंबर ॥ कलियुगींअवतारजाहले ॥ ६८ ॥ धन्यधन्यदीक्षितवंश ॥ पुण्यपुरुषांचापुण्यांश ॥ एकवटूनीदेवतांश ॥ बालचंद्रांशुउपजले ॥ ६९ ॥ [गुरुचिदंबरमाझीमाउली] ॥ करोकृपेचीसाउली ॥ काव्य- रत्नाचीहारावली ॥ समर्पणकेलीस्वामिकंठीं ॥ ७० ॥ [प्रेमसिंधूसियेईलभरतें] ॥ दुःखदारिद्र्यसरेलपरतें ॥ हो- तांचिदंबरकृपाअवचितें ॥ कलिकाळातेंनभीतसे ॥ ७१ ॥ ऐसेंहेंसद्गुरुचरित्र ॥ मधुररसाळअतिपावित्र ॥ श्रवणकरितांसकलत्र ॥ जनइहपरत्रेंसुखावे ॥ ७२ ॥ [शिवचिदंबरआमुचापिता] ॥ कैवल्यनिवासिनीआमुची- माता ॥ पशुपतीआमुचासखाभ्राता ॥ [समुद्धर्ताजीवमात्रां] ॥ ७३ ॥ स्वस्तिश्रीचिदंबरचरित ॥ ऐकतांतुष्टेल- सद्गुरुनाथ ॥ कैवल्यकिंकरश्रोतयांविनवीत ॥ [सुरसकथामृतपुढेंअसे] ॥ ७४ ॥ श्रीसद्गुरुचिदंबरार्पणमस्तु ॥ श्रीशांबादुर्गार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

## चतुर्थोध्यायसमाप्तः

श्रीसद्गुरुचिदंबरायनमः ॥ ॐनमोजीबालवेषधारी ॥ व्यापकजोतूंसर्वांतरीं ॥ अजअव्ययनिराकारी ॥ लीलावतारीजगद्गुरु ॥ १ ॥ विसरोनितुझियाचरणासी ॥ देवाजाहलोंपरदेशी ॥ आतांजरीत्वांकृपाकरिसी ॥ तरीभवसिंधूसीनभीतसें ॥ २ ॥ अनाथनाथाचिदंबरा ॥ परमपुरुषादिगंबरा ॥ पतितपावनादीनोद्धारा ॥ कृपासागराअनाथांच्या ॥३॥ आजन्मनेणेंभाषाप्राकृत ॥ अथवानपाहिलेंसंस्कृत ॥ परीनिवृत्तव्हावयादुष्कृत ॥ भगवल्लीलागातसें ॥ ४ ॥ शक्तिनसतांआरंभीकार्य ॥ नयामूर्खम्हणतीलआर्य ॥ परिचिदंबराचेंथोरऔदार्य ॥ वाचामाधुर्यदेईलकीं ॥ ५ ॥ सद्गुरूचीआज्ञाप्रमाण ॥ कोणमानीअप्रमाण ॥ गुरुचरित्रसागरींजाण ॥ अवगाहनकरीतसें ॥ ६ ॥ आतांनकरावीउपेक्षा ॥ मानवरूपाचीउपाक्षा ॥ पुरवींसंतसज्जनापेक्षा ॥ कमलदलाक्षा–उमापती ॥ ७ ॥ वदवींआपुलेंपुण्यचरित्र ॥ सुरम्यमरसमहापवित्र ॥ श्रवणकरितांप्राणिमात्र ॥ इहपरत्रसुख पावे ८ मगमुनीश्वरह्मणेब्राह्मणासी ॥ आतांएकाशांकीचरसी ॥ जेचिदंबरकथाअविनाशी ॥ भवव्यथेसी–हारवी ॥ ९ ॥ यापरीबाललीलाअद्भुत ॥ जनकजननीसीनित्यदावित ॥ तेणेंउभयतांसंतोषचित्त ॥ हर्षभरी–तअसतीकीं ॥ १० ॥ तोंएकेदिवशींअकस्मात ॥ चिदंबरखेळतांबाळांसमेत ॥ शिवपूजाकरावीसावचित्त ॥ ऐसेंवाटतमानसीं ॥ ११ ॥ मगरचिलेंएकशिवालय ॥ पाषाणाचेंलिंगमृन्मय ॥ श्रीसांबचरणींलावूनिलय ॥ मंगलद्रव्यसमर्पितसे ॥ १२ ॥ पत्रेंपुष्पेंबिल्वमंजरी ॥ भावेंवाहिल्याशशिशेखरीं ॥ धूपदीपनैवेद्यपरोपरी ॥ शिवमंदिरींकरीतसे ॥ १३ ॥ एकभावेंकरोनिपूजन ॥ मगकरितसेनामसंकीर्तन ॥ प्रेमेंनाचेकरीगायन ॥ पंचवदनतृप्तव्हावया ॥ १४ ॥ वस्तुनामिळेपूजावसरीं ॥ तरीपूजनकरीमानसोपचारीं ॥ शिवव्रतातेंआचरी ॥ ध्यानकरीईश्वराचें ॥ १५ ॥ पाहुनिचिदंबरबालभाव ॥ प्रसन्नजाहलेसदाशिव ॥ तैंबाळांवाटेलअपूर्व ॥ दे–

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

वाधिदेवऐसेंकरी ॥ १६ ॥ मृत्तिकाभासेशर्करासी ॥ तोचिनैवेद्यकरीशिवासी ॥ प्रदक्षिणागौरीहरासी ॥
साष्टांगेंसीनमीतसे ॥ १७ ॥ मगस्तोत्रकरूनिअपार ॥ भावेंआळवीगिरिजावर ॥ इंद्रचंद्रादिसुरवर ॥ कुबे-
रादिकिंकरजयाचे ॥ १८ ॥ प्रसादशर्कराघेऊनिकरें ॥ बाळांवांटीप्रेमभरें ॥ अंतरींनसेविकल्पवारें ॥ अ-
तिआदरेंकरूनी ॥ १९ ॥ बालकांदिधलेमृत्तिकाखडे ॥ तेचिजाहलेसाखरपेढे ॥ नवलपाहतांजाहलेंवेडे ॥ मा-
यबापांकडेसांगती ॥ २० ॥ आणीकतैसेचीइतरांसी ॥ ग्रामस्थलहानथोरांसी ॥ श्रुतजाहलेंअवघ्याग्रामासी ॥
दर्शनासियेतीग्रामवासी ॥ २१ ॥ तोचिदंबरबैसलेध्यानस्थ ॥ योगीजैसेसमाधिस्थ ॥ अंतरींपरमात्माकूटस्थ ॥
लोकतटस्थपाहती ॥ २२ ॥ सरळनासिकासुहास्यवदन ॥ आजानुबाहुविप्रनंदन ॥ पाहूनिसंतोषलेंमन ॥
समस्तजनसुखावले ॥ २३ ॥ भावेंनमूनिबाळासी ॥ सांगतिवृत्तांतपित्यासी ॥ हाअवतारीपुरुषमानुषी ॥ मग
निजालयासीपैंगेले ॥ २४ ॥ संतोषेंप्रार्थनाकरीपिता ॥ बाळाचिदंबराऐकताता ॥ प्रगटनहोइजेआतां ॥ तैशी
माताविनवीतसे ॥ २५ ॥ भगवदवतारचिदंबर ॥ तान्हेकींसामान्यनर ॥ सहजलीलाअपार ॥ वारंवार
करीतसे ॥ २६ ॥ दृष्टितरळतांमहाकाळ ॥ तोहीहोतसेअतिविकळ ॥ बालत्वींहोऊनिभयाकुल ॥ स्वभावको-
मलदावीतसे ॥ २७ ॥ जोअसेव्यापूनिब्रह्मांडीं ॥ पंचभूतात्मकमहापिंडीं ॥ आपणालागतेक्षणेथंडी ॥ वारा-
यापासोडीघावेगीं ॥ २८ ॥ अनंतब्रह्मांडेंज्याचेउदरीं ॥ भासतीअणुरेणुचियापरी ॥ क्रीडाकरितसेपरोपरी ॥
लीलावतारीजगद्गुरु ॥ २९ ॥ निर्विकारीअवस्थातित ॥ माताअंकींहोयनिद्रिस्त ॥ मध्यंतरींचहोयजागृत ॥
कदाभयाभीतहोऊनियां ॥ ३० ॥ पूर्णकामअसोनिआपण ॥ भक्तकामनाकरितीपूर्ण ॥ मृत्युलोकींहोऊनिअ-
वतीर्ण ॥ भवसिंधोत्तीर्णकरितीजना ॥ ३१ ॥ जवळीबोलावूनिएकेदिवशीं ॥ पितासांगेबाळकासी ॥ मानवा

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com